दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार ४ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३२३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

# लाडकी बहीण योजनेसाठी महिलांची झुंबड, अर्ज भरण्याच्या नावाखाली एजंटांची चंगळ

**विशेष /प्रतिनिधी**

राज्याच्या विविध भागात लागलेल्या महिलांच्या लांबच-लांब रांगा लागल्या आहेत. झुंबड उडालीय ती लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी... राज्याचा अर्थसंकल्प जाहीर करताना अजित पवारांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. या योजनेतील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये मिळणार आहेत. त्यामुळं कागदपत्रं आणि नोंदणी करण्यासाठी महिलांची अक्षरशः झुंबड उडाली. त्याचाच गैरफायदा घेऊन अनेक ठिकाणी एजंटांनी आणि सेतू केंद्र चालकांनी ५०० ते ६०० रुपये उकळायला सुरूवात केलीय. अकोल्याच्या मूर्तिजापूरमध्ये लुटीचा असाच धक्कादायक प्रकार उजेडात आला. लाडकी बहीण योजनेच्या नावाखाली राज्यात ठिकठिकाणी सुरू असलेली ही लूट थांबवावी, अशी मागणी विधिमंडळात देखील करण्यात आली. राज्य सरकारनं या प्रकारांची गंभीर देखल घेऊन कडक कारवाई करण्याचे आदेश दिलेत. कुणी अडवणूक किंवा पैशांची मागणी केल्यास कठोर कारवाई करावी, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिलेत. तर एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोन




महिलांना या योजनेचा लाभ घेता येईल, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केल. दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या निकषांमध्ये राज्य सरकारनं अनेक महत्त्वाचे बदल केलेत.

लाडकी बहीण योजनेत बदल
१) २१ ते ६५ वयोगटातील महिलांना ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येतील.
२) ऑगस्टमध्ये अर्ज केला तरी १ जुलैपासून अनुदान दिलं जाईल.
३) पिवळं आणि केशरी रेशनकार्ड असलेल्या महिलांना उत्पन्नाचा दाखला देण्याची गरज नाही.
४) आदिवास प्रमाणपत्राची अट शिथील करण्यात आलीय.
५) १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरला जाईल.
६)५ एकर शेतीची अट वगळण्यात आलीय.
७) कुटुंबातील २ महिलांना योजनेचा लाभ मिळेल.
८)परराज्यातील स्त्रीचा महाराष्ट्रातील पुरुषाशी विवाह झाल्यास त्या महिलेलाही लाभ मिळेल, असं सरकारनं स्पष्ट केलंय.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेमुळं राज्यातील लाखो महिलांचं आयुष्य बदलून जाणार आहेत. मात्र गरज आहे ती ख-या गरजू महिलांच्या खात्यात ती रक्कम जमा होण्याची... योजनेच्या नावाखाली लुटीचा धंदा सुरू करणा-या एजंटांना चाप लावण्याची देखील गरज आहे.रोहितच्या या कृतीने हार्दिकच्या चेहऱ्यावरही हसू फुललं. हा व्हिडीओ समोर येताच बघता बघता सोशल मीडियावर व्हायरल झाला, हिट झाला आणि तो पाहून सगळेच आनंदले.

## "राष्ट्रीय जैन सेनेच्या वतीने जैन समाजाची भावना दुखावणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी.



पुणे/पंकज भंडारी पुणे मार्केट यार्ड पोलीस स्टेशनमध्ये राष्ट्रीय जैन सेनेच्या वतीने जैन समाजाच्या भावना दुखावणाऱ्या स्टँडअप कॉमेडियन फर्नांडिसच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली. डॅनियल फर्नांडिस नावाच्या स्टँड अप कॉमेडीयने स्वतःच्या इंस्टाग्राम व युट्युब अकाउंटवर आपल्या जैन धर्माच्या सिद्धंतांवर, धार्मिकतेवर, आस्थापनावर, अपमान होईल अशा प्रकारचे व्हिडिओ करण्यात आलेले आहे. धर्म, श्रद्धा आणि आसता हा कॉमेडीचा विषय बनवून ह्या व्यक्तीने एक अत्यंत घृणास्पद कृत्य केले आहे. त्यामुळे जैन समाजामध्ये मोठ्या प्रमाणात आक्रोश निर्माण झालेला आहे. डॅनियल फर्नांडिसच्या विरोधात मार्केटयार्ड पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे साहेब यांना भेटून, एफ आय आर करण्या संदर्भात "राष्ट्रीय जैन सेनेचा" वतीने मागणी करण्यात आली आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती राष्ट्रीय जैन सेनेचे मयुर सरनोत (वरवंडकर), प्रीतम जैन, अक्षय परमार, भरत ओसवाल, स्नेहिल मेहता, मंगेश गांधी, उमेश ओसवाल उपस्थित होते.

## शहरातील अठरा वर्ष पूर्ण झालेल्या युवकांनी मतदान नोंदणी करून घ्यावी भिमसेन अप्पा लोमटे

### प्रभाग क्रमांक ४ परळीवेस अंबाजोगाई येथे विशेष मोहीम-भीमसेन आप्पा लोमटे

**अंबाजोगाई/परवेज पटेल**


देशाचे लोकतंत्र, संविधान लोकशाही, राजकारण २ समाजकारण या सर्व गोष्टी समजून न घेता आजच्या पिढीतील युवक युवती हे या सामाजिक गोष्टींपासून दूर जात आहेत या समजून घेण्यासाठी आपल्याला देशाच्या राज्यघटनेने एक अधिकार दिला आहे. त्या अधिकाराच्या बळावर आपण एक चांगली लोकशाही तयार करू शकतो व आपले राज्य चांगल्या पद्धतीने चालवणाऱ्याच्या हातात देणे हे मतदाराचे काम आहे. पुढील काळात होणाऱ्या विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, विधानसभेच्या होणाऱ्या



निवडणुकांमध्ये युवक युवतींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा यासाठी शासनाने परत एकदा नवीन मतदारांची नोंदणी सुरू केलेली आहे. तरी या नोंदणी कालावधीमध्ये युवक युवतींनी मतदार यादीमध्ये आपली नोंद करून घ्यावी. मतदान हे तुमच्या राजकीय, सामाजिक, अधिकारांसाठी एक महत्त्वाचे शस्त्र आहे. तुमच्या देशाच्या निर्णयांमध्ये भाग घेण्यासाठी व सातत्य वाढवण्यासाठी आपली मतदानातील भागीदारी किंवा सहभाग असणे आवश्यक फक्त सोशल मीडियामध्ये बसून देश कसा बदलेल, भ्रष्टाचार कसा कमी होईल याची चर्चा करण्यापेक्षा मतदान करून आपले अमूल्य मत चांगल्या उमेदवाराला देऊन एक नवीन बदल कसा घडून येईल हे फक्त आपल्या एका मतदानाने होऊ शकते. नवीन नोंदणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे आपल्या परिसरातील मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे किंवा ऑनलाईन संकेतस्थळावरून माहिती भरून पूर्ण करून घ्यावी. असे आवाहन युवा नेते भीमसेन आप्पा लोमटे यांनी केले आहे.

## अंबानी आयोजित सामूहिक विवाह सोहळ्यात नवदापत्त्यांवर भेट वस्तूंचा वर्षाव

**नाशिक/सुरेश इंगळे** अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या लग्न समारंभाला दोन आठवड्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक राहिलेला आहे, अशातच काल 2 जुलै रोजी अंबानी कुटुंबाने समाजातील वंचित घटकांसाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले होते. या सामूहिक विवाह कार्यक्रमाला मुकेश अंबानी, नीता अंबानी ,आकाश अंबानी, श्लोका अंबानी, ईशा अंबानी ,आणि आनंद पिरामल यांचे संपूर्ण कुटुंब उपस्थित होते .त्याचप्रमाणे स्थानिक सामाजिक कार्यकर्ते या विवाहाला उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांसाठी तेथील स्थानिक वारली या जमातीने पारंपारिक तारपा नृत्य सादर करून कार्यक्रमाचे लौकिक



आणखीनच वाढवण्यात भर टाकली .तसेच वधू आणि वर यांना सदिच्छा म्हणून अंबानी कुटुंबाने प्रत्येक जोडप्याला सोन्याचे दागिने , मंगळसूत्र , अंगठ्या, नथ .जोडवी आणि पैंजण यासारखे चांदीचे दागिनेही दिले. एवढ्यावरच नव्हे तर प्रत्येक जोडप्याला एका वर्षासाठी पुरेसा किराणा सामान आणि घरगुती वस्तू भेट दिल्या .यामध्ये ३६ जीवनावश्यक वस्तू भांडी , गॅस , स्टोव्ह , मिक्सर , पंखे यासारखी उपकरणे आणि गादी पलंग




ग्रामीण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नेकनुर चे प्राचार्य श्री जालिंदर पैठणे यांच्या ३७ वर्षाच्या प्रदीर्घ व उत्कृष्ट सेवापूर्तीच्या नेकनुर येथे आयोजित कार्यक्रमात अलहुदा उर्दु हायस्कूल बीडचे मुख्याध्यापक डॉ पठाण सिराज खान व सह शिक्षक शेख मोईजोद्दीन यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## लोकसभा निकालानंतर प्रथमच केंद्रीय कृषी समिती नाशिक दौऱ्यावर.

**नाशिक/सुरेश इंगळे**

नासिक बाजार समितीतील कांदा खरेदी आणि सरकारकडून केंद्रात केली जाणारी खरेदी यातील फरक, तसेच सरकारी खरेदीतील त्रुटी मधील सुधारणा करण्यासाठीचे उपाय अशा अनेक मुद्द्यावर केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या समितीने लासलगाव येथे शेतकरी बाजार समितीचे पदाधिकारी, व्यापारी, अशा विविध घटकांशी भेटून चर्चा केली .नाफेड व एनसीसीएफ च्या खरेदीवर उत्पादकाकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते, या खरेदीची समितीने चौकशी केली. लोकसभा निवडणुकीत कांदा निर्यात



बंदीच्या विषयामुळे व सरकारी कांदा खरेदी विषयी उत्पादक समाधानी नव्हते. सरकारी वर्गातील रोशामुळे शेतकरी वर्गातील रोशामुळे महायुतीला राज्यात अनेक जागा गमावा लागल्या. आणि सत्ताधाऱ्यांनी ते मान्य सुद्धा केले .सरकारी कांदा खरेदी व्यवस्थेतील त्रुटीचा अभ्यास करण्यासाठी केंद्रीय कृषिमंत्रालयाच्या समितीने थेट नाशिक गाठले . कांद्याचा उत्पादन खर्च, मिळणारा बाजार भाव, निर्यातीचे परिणाम आधी विषयावर माहिती घेतली. या समितीने लासलगाव बाजार समितीत भेट देऊन बाजारातील लीलाव प्रक्रियेचे अवलोकन केले. कांदा विक्रीसाठी आलेल्या शेतकऱ्यांशी चर्चा केली. त्यांचे प्रश्न व मागण्या समजून घेतल्या . नाफेड व एनसीसीएफ मार्फत सरकारी कांदा खरेदी सुरू आहे त्या खरेदी केंद्रावरील केंद्रीय समिती गेली. शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्रुटी बाबत माहिती घेतली .केंद्रीय समिती सरकारी खरेदीची चौकशी करीत असल्याची चर्चा उत्पादकामध्ये आहे . या समितीने सरकारी खरेदीच्या सध्याच्या व्यवस्थेत काय बदल करता येईल या दृष्टिकोनातून माहिती संकलित केल्याचे सभापती बाळासाहेब शिरसागर यांनी सांगितले.

कविता

## पहिला पाऊस

पहिला पाऊस
ग्रीष्माने तप्त अवनिला
आतुरता वर्षा ऋतूची
कोसळणाऱ्या धारांनी
चिंब चिंब भिजण्याची

डोळे आभाळा भिडलेले
नजरेत वेध पावसाचे
कृष्ण शामल मेघांच्या
बरसत्या आगमनाचे

वादळ वाऱ्यांच्या सोबतीने
सौदामिनी लागली हसू
घन ओथंबून आले खाली
जलधारा लागल्या बरसू

थेंब टपोरे गवतावरती
अलगद लागले झुलू
झाडे वेली पाने फुले
वाऱ्यासंगे वेगे डोलू

पहिला पाऊस आला
निसर्गाच्या हिरव्या कुशीत
डोंगर दऱ्या भिजून गेल्या
रानवाटा हसल्या खुशीत

ओलेत्या मातीचा गंध
आसमंती दरवळला
माझ्या मनी माझ्या देही
मोगरा प्रीतीचा फुलला

सौ. वंदना शशिकांत पाटील

# डॉ.बाबू जोगदंड यांच नियोजन छान; बालाघाटाने सोनवणेंना मिळवून दिला विजयाचा मान!

**बीड/प्रतिनिधी**



लोकसभा निवडणुकीत बजरंग सोनवणे यांच्या गळ्यात विजयाची माळ घालण्यात बालाघाटाने महत्त्वाची भूमिका बजावली.बूथ मॅनेजमेंट, शेवटच्या कार्यकर्त्यां पर्यंत सुसूत्र नियोजन लावून डॉ.बाबू जोगदंड यांच्यातील "चाणक्या"ची चुणूक दिसून आली. लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवार व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे यांच्यात अटीतटीची लढाई झाली. या निवडणुकीत राजकीय धुरीनांना देखील विजयश्री कोणाला मिळेल याचा अंदाज बांधणं अवघड होऊन बसलं होतं. मतमोजणीच्या दिवशी तर ट्वेंटी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यांची प्रत्येकाला आठवण झाली.इतकी काट्याची टक्कर कधीच अनुभवाला आली नव्हती. भाजप उमेदवारांने 38 हजाराहून अधिक मतांची आघाडी घेतल्यानंतर तर भाजपचा विजय निश्चित मानला जात असतानाच बालाघाटाने तोंडाशी आलेला घास अक्षरशः हिरावून घेतला. बालाघाटावरील ईव्हीएम मशीनच्या आकड्यांमूळे विजय दुरावला जाऊ लागला.बजरंग सोनवणे विरोधी उमेदवाराची आघाडी तोडण्यात यशस्वी होऊ लागले. जसजशा शेवटच्या फेऱ्या मोजल्या जाऊ लागल्या तसतसं विजय कोणाचा? हे ठरवणं आणखी अवघड होऊन बसलं.त्यातच शेवटच्या टप्प्यात काय घडणार याची उत्कंठा प्रत्येकाला च लागली. शेवटी विजयाची माळ बजरंग सोनवणे यांच्या गळ्यात टाकण्यात बालाघाटाला यश आलं.बालाघाटाने मिळवून दिलेल्या यशाचा पडद्यामागचा सूत्रधार मात्र पडद्यामागेच राहिला गेला, प्रसिद्धीपासून त्याने अलिप्तता बाळगली.डॉ. बाबू जोगदंड यांनी ही कामगिरी फत्ते करून दाखवली बारामती लोकसभेच्या प्रचाराची धुरा सांभाळत असताना त्यांनी आपल्या भागाकडे देखील तितकंच बारकाईने लक्ष ठेवलं. प्रत्येक गावामध्ये कार्यकर्त्यांची फळी उभा करत आपली प्रचार यंत्रणा कामाला लावली. मायक्रो मॅनेजमेंट ( सूक्ष्म नियोजन) च्या माध्यमातून प्रत्येक सूत्र त्यांनी हलवली. वरवरून भाजप उमेदवाराला अनुकूल वातावरण दिसत असलं तरी आतून मात्र वेगळच चित्र निर्माण करण्यात आपल्या हातखंड्याचा, चाणक्य नीतिचा त्यांनी वापर करत. घाटमाथ्यावरील भाजपच्या नेत्यांना कार्यकर्त्यांना डॉ. जोगदंड यांनी लीलया चितपट केलं.यामुळे येणाऱ्या निवडणुकां मधून राजकीय समीकरणं बदलवण्यात वारं फिरवण्यात डॉ .बाबू जोगदंड यांच्या अनुभवाचा फायदा राष्ट्रवादी काँग्रेसला मोठ्या प्रमाणावर होणार आहे तर प्रतिस्पर्धी असलेल्यांना कात्रजचा घाट दाखवणारा ठरणार आहे

# नावालाच पावसाळा : तापमान ४० अंश सेल्सिअसवर,=कापूस उत्पादकावर दुबार पेरणीचे संकट

जुन महिना संपत आला परंतु तापमान अजुन ही ४० अंश सेल्सिअसवर आहे.दमट हवेमुळे नागरिकांना प्रचंड उकाड्याला सामोरे जावे लागत आहे.वातावरणातील उकडा दमटपणा कमी झाला नाही.उन्हाळयासारखे उन्हाचे चटके बसत असल्याने उकाडा कधी कमी होणार असा सवाल नागरीक ऐकमेकांना विचारत आहेत.त्यात वीजेचा लपंडाव सुरु असल्याने त्यात आणखी भर पडत आहे.



**गंगापुर/प्रा.संजय तुपे** गंगापुर तालुक्यात यंदा वेळेवर पावसाळा सुरू झाला.रोहीणी नक्षत्राचे दमदार पाऊस झाले.मात्र त्यानंतर पाउस होऊन बावीस दिवस उलटले.दमदार पाऊस बरसला नाही.शेतकऱ्यांनी कापसाची धूळ पेरणी केली.मागील चार दिवसात काही भागात तूरळत पाऊस झाला खरा मात्र तापमानाचा आकडा ४०°c च्या कमी झालेलं नाही.ज्या शेतकऱ्यांनी सुरुवातीलाच कापसाची पेरणी केली.त्या शेतात अंकुर फुटले आहेत.वातावरण असंच राहिलं तर दुबार पेरणीचे संकटओढावेल ही चिंता बळीराजाला सतावत आहे. हवामान खात्याचाअंदाजानुसार मान्सून लवकरयेईल या आधारावर तालुक्यांतील भेंडाळा, पखोरा,धानोरा,कायगाव, गळणीब,पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी कापसाची लागवड केली.पाऊस गायब झाल्यामुळे शेतकरी वर्ग चिंताग्रस्त आहे. खरीप हंगाम वाया जाणार असल्याची खंत शेतकरी बोलून दाखवत आहेत. विशेष म्हणजे अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी केली आहे. पाऊस न झाल्यामुळे पिके धोक्यात आली आहेत.त्याचबरोबर पिकांची वाढ खुंटली आहे.पिकांना पावसाच्या पाण्याची नितांत गरज आहे.पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांसमोर आता एक मोठं आव्हान उभं राहिलं आहे

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेफसाठी सेतू केंद्र चालकाकडून आर्थिक लूट उत्पन्न व रहिवासी साठी लाडक्या बहिणीला मोजावे लागतात ३०० रुपये

**अंबाजोगाई/परवेज पटेल**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महत्त्वकांशी योजनेपैकी माझी बहिण लाडकी योजने अंतर्गत राज्यातील हजारो महिलांना प्रत्येक महिन्यात १५०० रुपयांचा निधी देण्यात येणार आहे या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने परिपत्रक काढले असून ऑनलाईन पद्धतीने अर्ज दाखल करत योजनेचे लाभ घेण्याचे आवाहन शासनाकडून करण्यात आले आहे. या योजनेसाठी उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्राची अट असल्याने राज्यातील हजारो महिलांना तहसील कार्यालयाचे खेटे मारावी लागणार आहे यातच सेतू सुविधा केंद्र चालकाकडून उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र काहण्यासाठी ३०० ते ४०० रुपये आकारण्यात येत आहे लाडकी बहीण बोजने अंतर्गत बीड जिल्ह्यातील लाखो महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे यासाठी राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार ठराविक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे




मुख्य उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र या योजनेच्या अंमल बजावणीसाठी प्रत्येक महिलेला लागणार आहे यासाठी प्रत्येक सेतू सुविधा केंद्राबर उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र काढण्यासाठी मोठी गर्दी होत आहे या संधीचा फायदा सेतू सुविधा केंद्र चालक घेत असल्याचे दिसून येत आहे ठराविक रक्कम उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र साठी लागत आहे मात्र ३०० ते ४०० रुपये प्रत्येकी प्रमाणपत्रासाठी घेतले जात असल्याने लाडकी बहीण माझी योजनेसाठी बीड जिल्ह्यातील महिलांना जादा पैसे मोजावे लागत आहे. सेतू सुविधा केंद्र चालकांनी राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्रासाठी रक्कम अकराची बीड व अंबाजोगाई शहरात प्रत्येक ऑनलाइन सेतू सुविधा केंद्रात मोठी गर्दा दिसून येत आहे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महत्त्वाकांशी योज योजनेसाठी राज्य शासन महत्त्वपूर्ण पाऊल उचलत योजना यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील असताना स्थानिक पातळीवर मात्र उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र काडण्यासाठी लाडकी बहिणीला ३०० ते ४०० रुपये मोजावे लागत आहे. सेतू सुविधा केंद्र चालकाने दर्शनी भागात भाव फलक लावावे राज्य शासन व तहसील यांनी ठरवून दिलेल्या नियमात उत्पन्न रहिवासी व इतर महत्त्वपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला सेतू सुविधा केंद्रात जाणे आवश्यक झाले आहे अनेक वेळा सेतू सुविधा केंद्र चालकाकडून संधीचा फायदा घेत जादा पैसे आकारले जातात सेतू सुविधा केंद्रात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला दर फलक माहीत असावी यासाठी सेतू सुविधा केंद्र मालकाने दर्शनी भागात प्रमाणपत्राचे दर फलक लावावे यासाठी जिल्हाधिकारी व प्रत्येक तहसीलदार यांनी खबरदारी म्हणून सेतू सुविधा केंद्र चालकांना सुचित करावे नसता त्यांच्यावर दंडकमक कारवाई करावी अशी मागणी सामान्य नागरिकांतून होत आहे

# मपेट चे वेळापत्रक जाहीर १ जूलैपासून ऑनलाईन नोंदणी तर १ सप्टेंबर रोजी परीक्षा

**छ. संभाजीनगर /प्रा.संजय तुपे**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्यावतीने पीएच.डी एन्ट्रेन्स टेस्ट (पेट-२०२४) घेण्यात येणार आहे.

या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाले असून १ जुलैपासून ऑनलाईन नोंदणी करण्यात येणार आहे. अधिष्ठाता मंडळाची प्रकुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन वेळापत्रकास अंतिम मान्यता देण्यात आली. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही संपुर्ण प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. 'पेट'साठी चारही विद्याशाखांचे अधिष्ठाता डॉ.महेंद्र शिरसाठ, डॉ.संजय साळुंके, डॉ.वैशाली खापर्डे, डॉ.वीना हुंबे, संचालक डॉ.भालचंद्र वायकर यांनी प्रयत्न केले. एकूण ३३ विषयासाठी ही परीक्षा होणार असून यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, मानव्यविद्या, आंतरविद्याशाखा, व वाणिज्य या शाखांचा समावेश आहे. प्रवेशपूर्व प्रक्रिया 'ऑनलाईन' पध्दतीने राबविण्यात येणार आहे. 'पेट'साठी पदव्यूत्तर पदवी (बी प्लस श्रेणी उत्तीर्णसह) विद्यार्थी नोंदणी करु शकणार आहेत. 'पेट-२०२४' चे वेळापत्रक पुढील प्रमाणे ऑनलाईन नोंदणी १ ते २० जुलै, कागदपत्रांची पडताळणी - २८ जुले ते ८ ऑगस्ट,प्राथमिक यादी




- १४ ऑगस्ट, अंतिम यादी - १९ ऑगस्ट,पेट परीक्षा - १ सप्टेंबर, निकाल-१२ सप्टेंबर

या प्रमाणे 'पेट'चे वेळापत्रक असणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी, असे परीक्षा मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ.भारती गवळी यांनी कळवले आहे.

३३ विषयासाठी पेट होणार 'पेट-२०२४' ही एकूण चार विद्या शाखेतील ३३ विषयांसाठी घेण्यात येणार आहे. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, मानव्यविद्या शाखा, आंतरविद्या शाखा तसेच वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा यांचा समावेश आहे. या अंतर्गत शारिरीक शिक्षण, नाटयशास्त्र, शिक्षणशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, समाजकार्य, जैवतंत्रज्ञान, जीवरसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, संगणक अभियांत्रिकी, संकणगशास्त्र, पर्यावरणशास्त्र, अन्न तंत्रज्ञान, भुगर्भशास्त्र, गणितशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, औषनिर्माणशास्त्र, पदार्थविज्ञान, संख्याशास्त्र, प्राणीशास्त्र, इंग्रजी, मराठी, संस्कृत, हिंदी, ऊर्दु, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, लोकप्रशासन, मानसशास्त्र, भुगोल, वाणिज्यशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र व पर्यटन प्रशासन आदी विषयांचा समावेश आहे. १ जुलै रोजी पासून 'पेट'साठी नोंदणी सुरु करण्यात येईल.ह त्याच दिवशी विषयनिहाय संशोधकांसाठीची रिक्त जागांची संख्या ही उपलब्ध असणार आहे, असे उपकुलसचिव परीक्षा विभाग विजय मोरे यांनी कळविले आहे.

# केज रोटरीच्या अध्यक्षपदी रो प्रकाश कामाजी तर सचिवपदी अनंत तरकसबंद

**केज /प्रतिनिधी**

केज येथील रोटरी क्लब ऑफ केजच्या च्या नवीन वर्षात अध्यक्ष म्हणून व्यंकटेश ज्वेलर्स चे संचालक प्रकाश कामाजी तर सचिवपदी आदर्श शिक्षक अनंत तरकसबंद यांनी १ जुलै रोजी सूत्रे हाती घेतली. डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये रोटरी क्लब ऑफ केज नामांकीत क्लब असून केजच्या सामाजिक सेवेत या क्लब चे मोठे योगदान आहे. सांस्कृतिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक जनजगृतीमध्ये केज रोटरीने आजपर्यंत मोठे कार्य केले आहे. आजपर्यंत अनेक माजी अध्यक्ष सदस्यांनी आपापल्या काळात वेगवेगळी कामे केली आहेत. यापुढील काळात केज रोटरीने केज शहरातील युवकांचा सहभाग वाढवून या अंतरराष्ट्रीय सामाजिक संस्थेचे कार्य युवकांच्या



हाती सोपवण्याचे ठरवले आहे. नवीन वर्षात केज शहरात वृक्षारोपण, आरोग्यशिबिरे, स्मशानभूमीतील अत्यावश्यक सुविधा यासह शहरात अत्यावश्यक ठिकाणी महिला व पुरुषांसाठी युरिनल स्पॉट बांधण्याचे ठरवले असल्याचे नूतन अध्यक्ष प्रकाश कामाजी व सचिव अनंत तरकसबंद यांनी सांगितले. नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी केज क्लब ने डॉक्टर्स डे, कृषिदिन, व सीए दिनाच्या निमित्ताने शहरातील वैद्यकीय, कृषी व सीए क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार उपक्रम पार पाडला. यापुढे रोटरीच्या सर्व उपक्रमासाठी केजवासीयांनी योग्य ते सहकार्य करावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष हनुमंत भोसले, विकास मिरगणे, प्रवीण देशपांडे,महेश जाजू, दादा जमाले, सूर्यकांत चवरे,दत्तात्रय हंडीबाग, अरुण अंजाण, बापूराव सिंगण, डॉ दिनकर राऊत ,सीए सूचित शेटे व केज रोटरीच्या सर्व सदस्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपत केला वाढदिवस साजरा, जि.प.चे आदर्श शिक्षक अशोक नावंदे यांचा स्तुत्य उपक्रम

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

तालुक्यातील संगम जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री अशोक नावंदे यांचा वाढदिवस आज बुधवार दिनांक 3 जुलै रोजी विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. जि.प.प्राथमिक शाळा संगम येथे वृक्षारोपण तसेच प्राथमिक शाळेतील विद्यार्थी यांना शालेय साहित्य वही पेन खाऊ वाटप करून साजरा करण्यात आला.केले. शाळेतील विद्यार्थी व शाळेच्या अडचणी जाणून घेतल्या. शाळेच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न व मदत केली जाईल. तसेच सर्वांनी वाढदिवस साजरे करताना समाजिक उपक्रम राबवावेत अशी मनोकामना श्री अशोक नावंदे यांनी व्यक्त केली. बीड जिल्हा परिषदेचे आदर्श शिक्षक तथा जि प प्रा शा संगम शाळेचे मुख्याध्यापक अशोक नावंदे हे आपला वाढदिवस दरवर्षी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून करत असतात. त्याचप्रमाणेच आज दि 3 जुलै 2024 रोजी ही त्यांनी स्वतःचा वाढदिवस इतर कुठलाही



खर्च न करता विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करून साजरा केला . दरम्यान या शाळेतील सर्व शिक्षकही आपला वाढदिवस अशाच प्रकारे इतर बाबीवर खर्च न करता शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून करत असतात. विद्यार्थीही अशा उपक्रमामुळे शिक्षकांच्या वाढदिवसाची आठवण ठेवतात एवढेच नाही तर विद्यार्थीही आपल्या परिसरातील मिळणाऱ्या फुले , पाने यापासून पुष्पगुच्छ तयार करून आणतात व शिक्षकांचा आपुलकीने वाढदिवस साजरा करतात तसेच शाळेच्या वतीनेही विद्यार्थ्यांना वही, पेन, चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचाही वाढदिवस नियमितपणे साजरा केला जातो. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या सर्व उपक्रमात शिक्षक सर्वश्री महादेव गित्ते सर,सुभाष कोंकेवाड सर,शिक्षिका श्रीमती कल्पना बडे मॅडम, श्रीम.बबिता शिंदे मॅडम यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते.

# धारूर आगारातील वाहक दिनकर मुंडे यांना सेवानिवृत्ती.



**किल्ले धारूर/प्रतिनिधी**

धारूर एस टी आगारात ३२ वर्ष प्रदीर्घ सेवा करून वाहक दिनकर राजाराम मुंडे हे उत्कृष्ट सेवा करून सेवानिवृत्त होत असल्या मुळे धारूर आगार व कर्मचारी यांचे वतीने त्यांचा सपत्नीक गौरव करून त्यांना निरोप देण्या आला त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला, विवीध मान्यवरांनी त्यांचा गौरव बोलताना केला.

धारूर एस टी आगारातील वाहक दिनकर राजाराम मुंडे हे प्रदीर्घ ३२ वर्षाच्या सेवेनंतर सेवानिवृत्त होत असल्या बद्दल येथील एस टी आगारात सेवानिवृत्ती सोहळा आयोजित करण्यात आला होता .या समारंभाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख एन एम चौरे तर प्रमुख पाहुणे म्हणुण सहायक कार्यशाळा अधिक्षक भारत कोमटवार , लेखाकार द वी नडगीरे, पत्रकार अनिल महाजन हे उपस्थित होते. यावेळी दिनकर मुंडे यांचा सपत्नीक आगाराचे व सर्व कर्मचारी यांचे वतीने स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करून गौरव करण्यात आला. यावेळी वाहक दिनकर मुंडे यांनी सत्काराला उत्तर देताना या सेवा काळात सहकार्य करणारे सर्वाचे आभार व्यक्त केले. या वेळी बोलताना सहायक कार्यशाळा आधिक्षक भारत कोमटवार यांनी पुर्णवेळ सोबत सेवा केली. जिवनातील संघर्ष महत्वाचा असतो तो ब-याच चांगल्या बाबी शिकवतो असे सांगत मुंडे यांनी उत्कृष्ट सेवा केली महामंडळाची प्रामाणीक सेवा केली कर्तव्य करताना ईमानदारी ने केले. असे सांगितले .यावेळी अजय सोनटक्के शेख आतीक मुख्याध्यापक बोचरे ,सुत्रसंचलन डि बी मुंडे आभार अशोक मुळे यांनी मानले ,या कार्यक्रमास सर्व कर्मचारी नातेवाईक उपस्थित होते.

# वन्यजीवांचे माता- पिता सिद्धार्थ सोनवणे सृष्टी सोनवणे दाम्पत्याचा विश्वविक्रम

## सोळा हजार वन्यजीवांना जीवदान दिले वेब वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली नोंद




**शिरूर कासार/प्रतिनिधी**

जखमी, आजारी आणि मातृत्वापासून दुरावलेल्या वन्यजीवांचे संरक्षण संवर्धन जतन आणि प्रजनन संगोपन करणाऱ्या सर्पराज्ञी पुनर्वसन प्रकल्पाचे संचालक वन्यजीवांचे माता पिता सिद्धार्थ आणि सृष्टी सोनवणे यांनी जागतिक विश्वविक्रमाला गवसणी घातली आहे. सोळा हजार जखमी वन्यजीवांची देखभाल व काळजी घेवुन त्यांना पुन्हा एकदा नव्याने जीवन जगण्यासाठी नैसर्गिक अधिवासात सोडल्याबद्दल वेब वर्ल्ड रेकॉर्ड या जागतिक संस्थेने प्रमाणपत्र देवून सोनवणे दाम्पत्याला सन्मानित केले आहे.सोनवणे दाम्पत्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून तालुक्याची मान पुन्हा एकदा अभिमानाने उंचावली गेली आहे.गेल्या पंचवीस वर्षांपासुन तालुक्यातील तागडगांव येथील डोंगराळ भागात सिद्धार्थ आणि सृष्टी सोनवणे यांनी सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन प्रकल्पाची स्थापना करून मातृत्वापासुन दुरावलेल्या आणि जखमी पशू,पक्षी,प्राण्यांचे संवर्धन करण्याचे काम हाती घेतले आहे.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लोकसहभागाच्या जोरावर हे दाम्पत्य आपल्या लेकराप्रमाणे वन्यजीवांचा आणि निसर्गाचा सांभाळ करण्याचे काम करत आहे.त्यांच्या या निस्वार्थी सामाजिक कार्याबद्दल विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले असून त्या मध्ये अजून एका जागतिक विक्रमाची नोंद झाली आहे.30 जून वार रविवार रोजी त्यांना वर्ल्ड रेकॉर्ड मार्गदर्शक डॉ.प्रकाश कोंका आणि प्रसिद्ध व्यंगचित्रकार सुहास पालिमकर यांच्या हस्ते वेब वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.या वेळी पत्रकार गोकुळ पवार यांच्यासह आदर्श शिक्षक शहादेव मुळे,सर्पमित्र महेश औसरमल यांची उपस्थिती होती.

# माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या वतीने अनाथ, निराधार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याच्या किटचे वाटप.

**किल्ले धारूर/प्रतिनिधी**

माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या वतीने आज सुंदररावजी सोळंके पतसंस्थेमध्ये अनाथ निराधार अशा तालुक्यातील 94 विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. दरवर्षी माजलगाव विकास प्रतिष्ठान, आधार प्रकल्प व लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी पतसंस्थेच्या वतीने आधार प्रकल्पांतर्गत अनाथ निराधार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याच्या किटचे वाटप केले जाते. याही वर्षी रविवार दिनांक 30 जून रोजी येथील सुंदररावजी सोळंके नागरी पतसंस्थेमध्ये 94 विद्यार्थ्यांना शालेय साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले. यात रजिस्टर, छत्री ,चप्पल ,गणवेश ,कंपास व इतर साहित्याचा समावेश होता.

या साहित्य वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक महारुद्र इंगळे, कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक सिद्धेश्वर काळे, विधीतज्ञ परमेश्वर शिनगारे



,पत्रकार सचिन थोरात, नाथा

ढगे, सिंदफणा पब्लिक स्कूलचे पुरुषोत्तम सोळंके, गडाख सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी विधीतज्ञ परमेश्वर शिनगारे पत्रकार सचिन थोरात ,नाथा ढगे ,महारुद्र इंगळे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या चिमुकल्या अनाथ निराधार विद्यार्थ्यांनी खूप शिकून मोठे होऊन पुस्तकाशी मैत्री करून आपले वेगळे अस्तित्व निर्माण करावे असे आवाहनही प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगत आतून व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदेश डोंगरे यांनी केले तर आभार लोकनेते सुंदरराव सोळंके पतसंस्थेच्या दामिनी चिंचाळकर यांनी मानले या कार्यक्रमाचे योग्य असे नियोजन पतसंस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी तसेच माजलगाव विकास प्रतिष्ठान व सिंदफणा पब्लिक स्कूलच्या कर्मचाऱ्यांनी केले होते या कार्यक्रमातून अनाथ निराधार विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता यातून त्यांच्या शिक्षणाला मदत होणार असून ते यातून भरारी घेणार आहेत. या माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पोलीस पाटील यांची रिक्त पदे तात्काळ भरा प्रा.ईश्वर मुंडे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**बीड/प्रतिनिधी**

पोलीस पाटील हे गाव गाडयातील मान सन्मानाचे तसेच शांतता- सुव्यवस्था टिकवून ठेवत पोलीस प्रशासन व जनता या मध्ये समन्वय ठेवणारे महत्वाचे पद आहे.

महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यातील बहुतांशी पोलीस पाटील यांची पदे विविध कारणांनी रिक्त झालेली आहेत. सदरील पदे अनेक वर्षा पासून रिक्तच आहेत. या मुळे गावगाडयात एक पोकळी निर्माण झालेली आहे.

तरी बीड जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही तात्काळ करून ही पदे लवकरात लवकर भरावीत असे लेखी निवेदन प्रा.




ईश्वर आनंदराव मुंडे,राज्य प्रमुख, सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी विभाग, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांनी मा.अविनाश पाठक,जिल्हाधिकारी,बीड यांना दिले आहे.

सदरील मागणीच्या निवेदनास सकारात्मक प्रतिसाद देत पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्याबाबत जलद गतीने कार्यवाही करून ही पदे लवकरात लवकर भरू असे अश्वासन मा.अविनाश पाठक जिल्हाधिकारी,बीड यांनी दिले असल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी प्रसिध्दी माध्यमांना सांगितले आहे.

या वेळी सोबत श्रीराम मुंडे, प्रदेश प्रवक्ते,राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष भटके विमुक्त विभाग हे होते.

# डोक्यात दगड टाकून विधवा महिलेची हत्या करणाऱ्या आरोपीस अटक

## भारतात नव्यानेच लागू झालेल्या ३०२ ची पहिली अंमलबजावणी जामनेर तालुक्यातच

**जळगाव/संजय जटाळे**

जामनेर तालुक्यातील शहापूर येथील विधवा महिलेच्या डोक्यात दगड टाकून तरुणाने खून केल्याची चित्त थरारक घटना घडली असून मयत संगीता पिराजी शिंदे ( वय ३६ ) आरोपी किरण कोळी तळेगांव (वय २६) मद्यधुंद अवस्थेत तरुणाने ३६ वर्षीय महिलेच्या डोक्यात दगड टाकून खून केल्याची घटना दिनांक १ जुलै रोजी सकाळी घडली असल्याची माहिती समोर आली आहे. सविस्तर वृत्त तळेगाव येथील आरोपी किरण कोळी उर्फ लाहण्या (वय २६) या तरुणाने महिलेच्या घरी जाऊन सतत महिलेसोबत वाद घालत असायचा तसेच आज सकाळी महिलेसोबत वाद



घालून रागाच्या भरात तरुणाने महिलेच्या डोक्यात दगड टाकून महिलेला ठार करून तिथून पळून गेल्याचा प्रकार घराजवळील काही नागरिकांच्या लक्षात आला हा प्रकार लक्षात येताच त्वरित जामनेर पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांना घटनेची माहिती देण्यात आली माहिती मिळताच पोलीस निरीक्षक यांची तात्काळ घटनास्थळी पोलिस यंत्रणा दाखल झाली. फरार झालेला आरोपी याचा शोध घेत त्याला पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक किरण शिंदे व त्यांची टीम करीत आहे. खुनाचे कारण मात्र अद्याप पर्यंत समजू शकले नाही.

सदर आरोपीस जामनेर पोलिसांनी ताब्यात घेतले असून भारतात नव्यानेच लागू झालेल्या ३०२ कायद्याअंतर्गत महाराष्ट्रात पहिल्यांदाच जामनेर तालुक्यात गुन्हा दाखल करण्याचे काम जामनेर पोलीस स्टेशन ने केल्याचे दिसून आले आहे.

# स्कॉलरशिपसाठी पात्र विद्यार्थ्यांचा राजमाता जिजाऊ विद्यालयात सत्कार



**गेवराई/प्रतिनिधी**
जानेवारी २०२४ मध्ये झालेल्या स्कॉलरशिप परीक्षेत गुणाानुक्रमे पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात राजमाता जिजाऊ माध्यमिक विद्यालय रोहितळ येथे सत्कार करण्यात आला. शोभादेवी महिला सेवाभावी संस्था संचलित रोहितळ येथील राजमाता जिजाऊ माध्यमिक विद्यालयात इयत्ता सहावी मध्ये शिक्षण घेणाऱ्या समर्थ भागवत पवार (१९२) आणि महारुद्र महादेव बोंदरे ( १७८) हे दोन्ही विद्यार्थी जानेवारी २०२४ मध्ये झालेल्या स्कॉलरशिप परीक्षेमध्ये गुणाानुक्रमे पात्र ठरले आहेत. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचा शाळेचे मुख्याध्यापक राजाभाऊ क्षीरसागर आणि मराठवाडा शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष दिनकर शिंदे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना मुख्याध्यापक राजाभाऊ क्षीरसागर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये होणाऱ्या प्रत्येक स्पर्धेमध्ये भाग घेतला पाहिजे. या स्पर्धेच्या आणि परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवनवीन संधी मिळत असतात. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना भावी आयुष्यामध्ये निश्चितपणे होतो. प्रास्ताविकपर भाषणात गोविंद राऊत म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शालेय स्तरावर मिळणाऱ्या प्रत्येक संधीचे सोने करणे गरजेचे आहे. अनेकांमध्ये कलागुणांसह वेगवेगळ्या विषयांचे ज्ञान असते परंतु ते प्रकट करण्यासाठी त्यांना संधी मिळत नाही. शाळेत मात्र वेगवेगळ्या स्पर्धा आणि परीक्षा होत असल्याने ती संधी मुलांना मिळते त्यात प्रत्येकाने भाग घेतला पाहिजे असे ते म्हणाले.

याप्रसंगी पालक भागवतराव पवार, जि प प्राथमिक शाळा बेलगुडवाडीचे मुख्याध्यापक नंदकुमार पवार, सहशिक्षक प्रशांत मस्के, आसाराम चादर यांच्यासह राजमाता जिजाऊ माध्यमिक विद्यालयातील शिक्षक वसंत केदार, सौ संगीता खराडे, बालाजी शिंदे, आदिनाथ आर्सुळ, रेवन भोईटे, गोविंद राऊत, रेवणनाथ वराट, रामप्रसाद गव्हाणे, विठ्ठल चाळक यांच्यासह विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती परीक्षामध्येदेखील तालूक्यामध्ये ब्लू बेल्सच्या विद्यार्थांनी झळकावली आपली गुणवत्ता.

**नायगाव/प्रतिनिधी**
महाराष्ट्र राज्य प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृती परीक्षा मंडळ पुणेच्या वतीने नुकतेच फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये नायगाव तालूक्यात ब्लू बेल्सच्याच विद्याथ्र्यानी आपली गुणवता झळकावून शाळेचे मान उंचावले आहे. अशाच पध्दतीचे यश दहावीच्या परीक्षेमध्येही अनेक विद्यार्थांनी आपली गुणवता दाखवून दिली आहे यावरून कोणत्याही स्पर्धा परीक्षेमध्ये ब्लू बेल्सच्या विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सातत्याने कायम ठेवल्यामुळे नांदेड जिल्यात नायगावामध्ये शैक्षणिक गुणवता प्रभावी असल्याचे पालकामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नायगाव तालुक्यामध्ये प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षामध्ये १५ विद्यार्थी शिष्यवृती धारक विद्यार्थी पात्र झाले असून १० विद्यार्थी हे ब्लू बेल्स या इंग्रजी माध्यम शाळेचे आहेत तर माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये तालूक्यात एकून ८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले असून ब्लू बेल्स इंग्रजी माध्यम शाळेचे ५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. या विद्यार्थांना शिवम बावणे, हरीष गायकवाड, नागेश घंटे, जयवंत बेळगे, सौ. संगिता गडगेकर, उज्वला भोसले, सविता मालवे, अरूणा दमकोंडवार, लता नायर व गीता पांचाळ इ शिक्षकांनी प्राथमिक शिष्यवृत्तीसाठी मार्गदर्शन केले तर माध्यमिकसाठी सिद्धार्थ गायकवाड, संभाजी जाधव . दता सुर्यवंशी, लक्ष्मण पाटील, दत्ता कंदुर्के, महेश मुंडकर, सौ. दिपाली मलमवार, वर्षा पाटील , सुनंदा मामीडवार, माला यरसनवार इ शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ.के हरीबाबू, उपाध्यक्ष डॉ. शंकर गड्डमवार, मुख्याद्यापिका सौ. लक्ष्मी मॅडम, सल्लागार डॉ.साई दीप्ती, गोविंद पवार, सय्यद गौस, दत्ता कंदुर्के, गंगाधर कानगुले यांनी केले आहे.

## माऊलींचा पहिला रिंगण सोहळा संपन्न



पैठण/चैताली औट संत ज्ञानेश्वर महाराजांची जन्मभूमी (आपेगाव ता.पैठण) येथून पालखी सोहळा शनिवारी आषाढी वारीसाठी आपेगावहून पंढरपूरकडे मार्गस्थ झाला. या पालखीचा पहिला रिंगण सोहळा मंगळवारी दुपारी १२ वाजता चकला बोरगाव(जि.बीड) येथे उत्साहात पार पडला. हे दृश्य डोळ्यात साठवितांना हजारो वारकऱ्यांनी विठोबाचा गजर केला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पायी दिंडी सोहळ्यात तीन रिंगण पार पडतात. त्यापैकी पालखीतील पहिले रिंगण मंगळवारी चकला बोरगाव या गावात पार पडले .वारकरी सांप्रदायातील शेकडे वर्षापासून पालखीच्या रिंगण सोहळ्याची परंपरा आहे. वारीत चालून थकलेल्या वारकऱ्यांना या माऊलींच्या अश्वाच्या रिंगण सोहळ्यामुळे ऊर्जा मिळते हे ही तितकेच खरे आहे.

## पैठण तहसील कार्यालयात शैक्षणिक दस्तऐवजासाठी विद्यार्थ्यांचे हेलपाटे महसूल विभागाला त्याचे ना सोयरसुतक ना मुहूर्त

पैठण/चैताली औटे
पैठण तहसील कार्यालयात शैक्षणिक दस्तऐवजी हजारो शालेय विद्यार्थी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या 16 जून पासून विविध प्रकरणी प्रमाणपत्र खोळंबली आहेत .पैठण तहसील कार्यालयातील तहसीलदार ,नायब तहसीलदार ,पेशाकार आणि संबंधित लिपिक यांना याचे नासोयर सुतक ना मुहूर्त आहे.गेल्या महिन्यात लोकसभेच्या निवडणुकीच्या आचारसंहितेचा बहाना सांगून चालढकल केली.आता मात्र सर्व्हर खराब आहे,साहेब कलेक्टर च्या मिटींगला गेले, नायब तहसीलदार बाहेर गेले, पेशाकार सुट्टीवर आहेत, लिपिक आजारी आहेत अशी अनेक कारणे सांगून विद्यार्थ्यांची खेळणी केली जाते आहे. विद्यार्थी नवीन प्रवेश ,पोलीस भरती ,संगणक प्रमाणपत्र अशा अनेक संधीसाठी रहिवासी उत्पन्न ,अधिवास ,नॉन क्रिमिलियर आदी अनेक प्रमाणपत्रासाठी रोज सकाळी १० ते सायं ५ पर्यंत दालनात रांगा लावून उभे ठाकतात. मात्र संकीर्ण ,सामान्य प्रशासन, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, पुरवठा, जमाबंदी एक ,जमाबंदी दोन , निवडणूक विभाग ,तर आवक



जावक कक्ष तसेच अभिलेख शाखा या एका ही ठिकाणी संबंधित अधिकारी कर्मचारी हजर नसतात.चार नायब तहसीलदार चार पेशाकार आपली मनमानी करतात .त्यातच 'लाडकी बहीण', 'संसार किट'अशा सरकारच्या नवीन योजना सुरू झाल्याने त्यासाठी आवश्यक असणारे विविध प्रमाणपत्र देखील तहसील कार्यालयातूनच घ्यावी लागतात. ती ही महिलांची गर्दी ची त्यात भर पडली असून यासाठी महिला घामाघूम होत आहे. विश्वसनीय सूत्रांकडून माहिती मिळते की या कामात मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असून महिलांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक केली जाते अशी माहिती समोर आली आहे. सोमवारी दिवसभर उप जिल्हाधिकारी सोनम बाफना तहसील कार्यालयात हजर होत्या मात्र तरी अनेक अधिकारी व कर्मचारी गैरहजर होते आणि दलालाचा सुळसुळाट सुरू होता. या सर्व विदारक परिस्थितीवर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी लक्ष घालून संबंधितांना सूचना द्याव्यात अशी मागणी ग्रामीण भागातील शेतकरी ,विद्यार्थी, महिला ,ग्रामस्थ करत आहेत.

## अनधिकृत पार्किंग करणाऱ्या वाहनांवर पोलिस प्रशासनातर्फे कारवाई

जानेवारी ते आजपर्यंत एकूण ७३८९ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. उरण परिसर,शंकर मंदिर जासई, NH4B या मार्गावर उभे असलेल्या अनधिकृत वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. चालक व मालकांनी आपली वाहने कोठेही पार्क करू नये.वाहतूकीच्या नियमांचे पालन करावे. येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना त्रास होईल असे वर्तन कोणीही करू नये.जो कोणी अनधिकृत पार्कींग करेल त्या वाहन चालक व मालकावर कारवाई करण्यात येईल.
- श्रीमती वैशाली गलांडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक.

**उरण /विठ्ठल ममताबादे**
संपूर्ण उरण तालुक्यात अनधिकृत पार्किंगची समस्या मोठ्या प्रमाणात उग्र रुप धारण केली आहे. अनधिकृत पार्किंग मूळे दरवर्षी उरण तालुक्यात अनेकांचे बळी जात आहेत.विविध अपघात व अनधिकृत पार्किंग मुळे आजपर्यंत ८०० हुन जास्त व्यक्तींचा मृत्यू उरण मध्ये झाला आहे.त्यामुळे या




पार्श्वभूमीवर उरण परिसर व मुख्यत्वे करून शंकर मंदिर जासई,हायवे मार्गावर डिसीपी मा. तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीमती वैशाली गलांडे व ट्रॅफिक पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अनधिकृतपणे असलेल्या वाहनांवर कारवाई केली. यावेळी कंटेनर , मालवाहतूक गाड्या, टेम्पो, ट्रक आदि वाहनांवर, वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली. या कारवाई मूळे उरण परिसर, जासई शंकर मंदिर,NH4B हायवे रोड आदि परिसर मोकळा झाला आहे. अनधिकृत पार्किंग करणारे वाहने हटविल्याने नागरिकांचा प्रवास सुलभ, आनंददायी झाला आहे.

## पर्यटकांनो पर्यटनात करू नका बेफिकिरी फाजील आत्मविश्वासाचे ठरू नका बळी

**कुडूत्री/सुभाष चौगले**
जीवन हे अनमोल आहे ते एकदाच मिळते याचा सारासार विचार करून येणाऱ्या पर्यटकांनी हुलडबाजी ,आततायीपणा,व फाजील आत्मविश्वास न बाळगता पर्यटनाचा आनंद घेतला तर पर्यटन सुखकारक व आनंददायी होईल. उगीच जीव धोक्यात घालून पर्यटन करणे हे फार चुकीचे असून घरी आपली कोणीतरी वाट पाहत आहे याचे जरा भान असू द्या. राधानगरी पर्यटनात दोन महिन्यात तीन घटना घडल्याने पर्यटन करणे पर्यटकांच्या जीवावर बेतत आहे. व नाहक जीवाला मुकावे लागत आहे. वर्षा पर्यटन धोक्याचे ठरत आह

पाऊस सुरू झाला की, महाराष्ट्र राज्यासह इतरत्र राज्यातील पर्यटक राधानगरी तालुक्यातील पर्यटनाला येतात.



राधानगरी तालुक्यातील धरणे,धबधबे, यांचा मनमुराद आस्वाद घेतात पण अनेक पर्यटक कोणतीही माहिती व अंदाज नसताना फाजील आत्मविश्वासाच्या जोरावर जी ठिकाणी धोकादायक आहेत व तिथे बंदी आहे अशा ठिकाणी जातात.व आपला जीव गमावतात. राधानगरी तहसील कार्यालय व पोलीस स्टेशन यांच्यामार्फत अनेक वेळा वारंवार धोकादायक ठिकाणांची माहिती देऊन सुद्धा पर्यटक अशा ठिकाणी जातात. मागील महिन्यात सेल्फी काढताना काळमावाडी धरणाजवळ एकाचा मृत्यू झाला. तर राधानगरी धरणाच्या च्या बॅक वॉटर जवळ तिघांचा मृत्यू झाला.तर काल निपाणी येथील दोघांना काळमावाडी नदीत आपला जीव गमवावा लागला.

अशा घडणाऱ्या घटनांमुळे पर्यटनावर बंदी येत असून शिस्तबद्धपणे वागणाऱ्या पर्यटकांच्या आनंदावर विरजन पडत आहे.

जीवन हे अनमोल आहे त्याचा आनंद घ्या घरी आपले कुटुंब वाट पाहत आहे याचा विसर पडू देऊ नका. आपल्या काही चुकामुळे इतरांनाही त्याचा त्रास सोसावा लागत आहे. याचीही येणाऱ्या पर्यटकांनी काळजी घेणे गरजेचे आहे..

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077